




पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com








■ वर्ष ७६ वे/अंक ९३ वा ■ ■ अमरावती, गुरुवार,दिनांक २० नोव्हेंबर २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर ३० कार्तिक १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■


## मोदी जगातील सर्वात लोकप्रिय नेते

नवी दिल्ली दि. १९ : पंतप्रधान नरेंद्र मोदी धडाडीचे निर्णय घेण्यासाठी ओळखले जातात. मग तो देशातील कोणता मुद्दा असो की आंतरराष्ट्रीय संकट. हे अमेरिका राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लावलाय. जेणेकरून भारत दबावात येईल आणि रशियाकडून तेल खरेदी करणं बंद करेल. मात्र पंतप्रधान मोदींनी अमेरिकेच्या दबावापुढे न जुमानता रशियाशी आपले व्यापारी संबंध सुरळीत चालू ठेवले. त्यांचा हा धडासी निर्णय आपल्याला माहितीये. त्यांच्या अशा धडाडीच्या निर्णयामुळे पंतप्रधान मोदी यांची लोकप्रियता दररोज वाढून लागलीय. पंतप्रधान नरेंद्र मोदी जगभरात पहिल्या क्रमांकाचे नेते बनले आहेत. ताज्या ग्लोबल लीडर अप्रूव्हल रेटिंग यादीत ते अव्वल स्थानावर आहेत.



तर महासत्ता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प थेट आठव्या नंबर आहेत. ग्लोबल लीडर अप्रूव्हल रेटिंग यादी मॉर्निंग कन्सल्टने जारी केली आहे. ही यादी ६ ते १२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत गोळा केलेल्या डेटावर आधारित आहे. या *(उर्वरित पान २ वर)*

## आज नितीशकुमार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार

पाटणा दि. १९ : उद्या, गुरुवारी (२० नोव्हेंबर) गांधी मैदानावर नितीश कुमार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील या समारंभाला उपस्थित राहणार आहेत. जेडीयूचे कार्यकारी अध्यक्ष संजय झा यांनी ही माहिती दिली. आज (१९ नोव्हेंबर) जेडीयू विधिमंडळ पक्षाची मुख्यमंत्री निवासस्थानी बैठक झाली. नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड करण्यात आली. भाजप त्यांच्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड करण्यासाठी देखील बैठक घेणार आहे. त्यानंतर, एनडीएची दुपारी ३:३० वाजता विधानसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये बैठक होईल. जेडीयू कोट्यातून १३ मंत्र्यांची नियुक्ती होऊ शकते अशी चर्चा आहे.



एनडीए विधिमंडळ पक्षाची बैठक सेंट्रल हॉलमध्ये होईल. भाजप, जेडीयू, एलजेपी(आर), एचएएम आणि आरएलएमचे सर्व २०२ आमदार उपस्थित राहतील. नितीश कुमार, चिराग पासवान, संतोष सुमन, उपेंद्र कुशवाह, सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा देखील उपस्थित राहतील. सर्व पक्ष त्यांच्या निवडलेल्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्यावर चर्चा करतील. एनडीए नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करेल. विधिमंडळ पक्षाचे नेते झाल्यानंतर, मुख्यमंत्री नितीश कुमार राज्यपालांकडे राजीनामा सादर करतील आणि सरकार स्थापनेचा दावा करतील. ही संपूर्ण प्रक्रिया संध्याकाळपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

२० तारखेला शपथविधी सोहळा

गांधी मैदानावर शपथविधी सोहळा होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित राहणार आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, उत्तराखंडचे *(उर्वरित पान २ वर)*

## सरसंघचालक मोहन भागवत मणिपूरला जाणार

### जातीय हिंसाचारानंतर प्रथमच ३ दिवसीय दौरा

मुंबई दि. १९ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत तीन दिवसीय मणिपूर दौऱ्यावर जात आहे. मणिपूर येथे दोन वर्षांपूर्वी घडलेल्या जातीय हिंसाचारानंतर प्रथमच मोहन भागवत यांचा हा दौरा नियोजित करण्यात आला आहे. याबाबत संघाच्या पदाधिकाऱ्यांनी माहिती दिली. २० नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर असे तीन दिवस मोहन भागवत मणिपूरमध्ये असणार आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, मोहन भागवत यांचा हा दौरा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजेच आरएसएसच्या शताब्दी सोहळ्याशी निगडीत आहे. मोहन भागवत २० नोव्हेंबर रोजी गुवाहाटीहून मणिपूरला जाणार आहेत. २२ नोव्हेंबर रोजी ते मणिपूर येथून प्रस्थान करतील. राज्यात हिंसाचार सुरू झाल्यापासून मणिपूरला हा त्यांचा पहिलाच दौरा असल्याचे संघाचे पदाधिकारी तरुणकुमार शर्मा यांनी सांगितले. यापूर्वी मोहन भागवत यांनी २०२२ मध्ये मणिपूरला भेट दिली होती.

या दौऱ्यादरम्यान मोहन भागवत विविध गटांशी संवाद साधतील. आरएसएस प्रमुखांच्या कार्यक्रमात काही नागरिक, स्थानिक आदिवासी समुदायाचे प्रतिनिधी आणि युवा नेते यांचा समावेश असेल. तरुण कुमार शर्मा म्हणाले की, ज्या दिवशी मोहन भागवत मणिपूरला पोहोचतील *(पान २ वर)*

## एकनाथ शिंदेंची अमित शाहांसोबत दिल्लीत तासभर चर्चा



नवी दिल्ली दि. १९ : महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या नाराजीनाट्याच्या घडामोडी सुरु आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला. भाजपकडून शिवसेनेच्या नेते, पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि इतर कार्यकर्त्यांना जो पक्षप्रवेश देण्यात आला त्यावरुन शिवसेनेच्या मंत्र्यांमध्ये नाराजी आहे. तसेच अनेक ठिकाणी शिवसेनेच्या मंत्र्यांना आव्हान देणाऱ्या राजकीय नेत्यांना भाजपने प्रवेश देत बळ दिल्याची चर्चा आहे. त्यामुळे त्या पक्षप्रवेशांवर शिवसेनेच्या मंत्र्यांचा आक्षेप आहे. याबाबत शिवसेनेच्या मंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर काल मुख्यमंत्र्यांची भेट घेत नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही बाजू ऐकून घेत

## निवडणुकांपूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यात २ हजार जमा ; महाराष्ट्रातील ९० लाख शेतकऱ्यांना थेट लाभ

मुंबई दि. १९ : केंद्र सरकार व राज्य सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभे आहेत. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हफ्त्याचं वितरण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलं. यापूर्वी राज्य शासनाने ही अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत म्हणून भरीव रक्कम वितरित करण्याचं काम केलं आहे. या नवीन २१ व्या हप्त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना लागवड, बियाणे, उपजीविका आणि इतर कृषी खर्चासाठी आवश्यक असे तातडीचे आर्थिक बळ मिळणार आहे. अशी प्रतिक्रिया राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

केंद्र सरकारच्या महत्वाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत देशभरातील पात्र शेतकऱ्यांसाठी २१ वा हप्ता आज वितरीत करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हा हप्ता देशातील लाखो शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांना रब्बी हंगामात मदत होणार आहे. पीएम किसान योजना शेतकऱ्यांना निश्चित वार्षिक उत्पन्न सहाय्य मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. योजनेनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६,००० रुपये इतकी आर्थिक मदत दिली जाते. ही मदत रु. २,००० च्या तीन समान हप्त्यांमध्ये थेट उद्दढ माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा केली जाते.

**रब्बी हंगामासाठी होईल शेतकऱ्यांना मदत**

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, पीएम किसान *(उर्वरित पान २ वर)*

## विलासनगरात युवकाची निर्घृण हत्या चाकूने भोसकले, आरोपी पसार

अमरावती, दि १९ : शहरातील विलासनगर येथील संविधान चौकात बुधवारी सायंकाळी ७.३० वाजताच्या दरम्यान एका थरारक घटनेत युवकावर चाकू हल्ला करण्यात आला. यात गंभीर जखमी झालेला तो युवक मृत्युमुखी पडला असून, या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

पोलिस सूत्रानुसार यश रविंद्र पाटणकर (२४) रा. विलासनगर अमरावती असे मृतक तरुणाचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी ७.३० वाजताच्या दरम्यान यश हा विलासनगर परिसरातील संविधान चौकात उभा होता. बुलेटवर आलेल्या तिन तरुणांनी अचानक यशवर हल्ला चढविला. चाकूचे वार वर्मी लागल्याने यश रक्ताच्या थारोड्यात पडला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये चांगलीच दहशत निर्माण झाली आहे. रक्ताच्या थारोड्यात पडलेल्या यशला टाकून हल्लेखोर बुलेटनेच पसार झाले. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर तसेच स्थानिक *(उर्वरित पान २ वर)*

## तुम्ही निवडणूक आयोगाची प्रतीमा मलीन करताय

### २७२ निवृत्त न्यायाधीश आणि अधिकाऱ्यांचे राहुल गांधींना पत्र



नवी दिल्ली दि. १९ : देशभरातील २७२ निवृत्त न्यायाधीश आणि नोकरशहांनी निवडणूक आयोगावर कथित मतदान हेराफेरीचा आरोप करत एक खुले पत्र जारी केले. त्यात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर टीका करण्यात आली. या पत्रावर १६ माजी न्यायाधीश, १२३ निवृत्त नोकरशह (१४ माजी राजदूतांसह) आणि १३३ निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांची स्वाक्षरी आहे. काँग्रेस पक्ष सतत निवडणूक आयोगासारख्या संवैधानिक संस्थांची विश्वासार्हता कमी करण्याचा प्रयत्न करत आहे, देशाच्या लोकशाही व्यवस्थेत अनावश्यक अविश्वास पसरवत आहे, असे या पत्रात म्हटले आहे. *(उर्वरित पान २ वर)*

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीवरील टांगती तलवार कायम

नवी दिल्ली दि. १९ : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर ५० टक्के आरक्षण मर्यादा वादावरुन टांगती तलवार कायम आहे. आरक्षणाच्या अंमलबजावणीत काही ठिकाणी ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचा आरोप करत दाखल याचिकेवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. मात्र, काही मुद्द्यांवर अधिक स्पष्टता आवश्यक असल्यामुळे ही सुनावणी आता मंगळवारपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. या कालावधीत कोणत्याही नव्या निवडणुकांची घोषणा होणार नाही.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांशी संबंधित याचिकांची सुनावणी आता पुढील मंगळवारी होणार.

न्यायालयाने स्पष्ट केलं की, ही बाब निवडणूक प्रक्रियेशी थेट संबंधित आहे, त्यामुळे सर्व तथ्ये समोर ठेवून निर्णय घ्यावा लागेल.

५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण लागू *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....

अक्षय




यांनी पहिले मिळून दुसऱ्यांचे घर फोडले आणि आता हे एकमेकांच्याच घरी चोरी करत आहेत.. त्यामुळेच तर संबंध खराब आहे सध्या यांचे!






संपूर्ण अमरावतीकरांचे श्रध्दास्थान, दैनिक हिंदुस्थान व मराठे परिवार व आप्तेष्टांचा आधारवड असणारे आमचे बाबा !!


बाबा... तुम्ही कर्तव्यालाच देव मानून त्याची पूजा केलीत नात्यातील विविध भूमिका समर्थपणे पेलल्यात, सचोटी, प्रेम, त्याग ह्यांचा त्रिवेणी संगम तुमच्या ठाई होता. तुम्ही दाखविलेल्या पाऊल वाटेवर आम्ही निष्ठेने व निश्चयाने मार्गक्रमण करीत आहोत.

"तुमच्या पुण्यस्मरणाच्या दिनी आम्हा सर्वांचे तुम्हाला विनम्र अभिवादन !!

मराठे कुटूम्बिय, महाबळ कुटूम्बिय, रघुनाथ फडके, अकोला
प्रसाद चिं. फडके, कल्याण, प्रशांत मोडक, अकोला, पाटणकर परिवार, नाशिक
केळकर परिवार, नागपूर, दामले परिवार, बंगलोर, प्रा.बी.टी. देशमुख व परिवार,
चोळकर व परिवार, भारतीय परिवार, अचलपूर, जांबुवंत देशमुख परिवार
सर्व कर्मचारी वृंद

हिंदुस्थान
अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलडाणा • वाशिम












■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम